# म्हाडा MHADA मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

## गिरणी कामगारांच्या अर्जांची ऑनलाईन स्विकृती

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ५८ बंद / आजारी गिरण्यांच्या गिरणी कामगारांना घरे देण्याच्या शासनाच्या निर्णयाच्या अनुषंगाने म्हाडा मार्फत सन २०१०-२०११ मध्ये एका मोहिमेद्वारे गिरणी कामगारांची माहिती संकलीत करण्यात आली. सदर मोहिमेत एकुण १,४८,७११ गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांनी अर्ज सादर केले असुन त्यांची यादी म्हाडाचे संकेतस्थळ http://mhada.maharashtra.gov.in वर दि.१४/०३/२०११ व दि.२७/०४/२०१२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली होती.

शासनाचे पत्र क्र. गिकाघ-२०१३/प्र.क्र.४५०/गृनिप, दि.०१/०४/२०१५ व पत्र क्र. गिकाघ-२०१७/ प्र. क्र.०६/गृनिप दि.०४/०३/२०१७ व मा.उच्च न्यायालयाने दावा क्र.२३८४/२०१५ मध्ये दि.३०/११/२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार **"ज्या गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांना सन २०१० -२०११ मधील मोहिमेच्या अनुषंगाने अर्ज करता आले नाहीत, केवळ अशाच गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांना"** नव्याने खालील बाबींच्या अधीन राहुन म्हाडाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाईन (Online) अर्ज सादर करण्यासाठी अंतिम मोहिम राबविण्यात येत आहे.

I) म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या सारस्वत बँकेकडुन ११०३२३ व ॲक्सिस बँकेकडुन ३८३८८ असे एकुण १,४८,७११ गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांच्या यादीत नाव समाविष्ट नाही, केवळ अशाच गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांना नव्याने अर्ज सादर करण्याची संधी देण्यात येत आहे. ऑनलाईन अर्ज भरण्यापुर्वी गिरणी कामगार /वारस यांनी आपले नाव यादीत समाविष्ट आहे किंवा कसे याबाबत म्हाडाचे संकेतस्थळ https://millworker.mhada.gov.in वर "गिरणी कामगार / वारसांचे नाव" किंवा "अर्ज क्रमांक" नमुद करुन खातरजमा करुन घ्यावी व यापूर्वी अर्ज सादर केला नसल्याची खातरजमा झाल्यानंतरच ऑनलाईन अर्ज सादर करावयाचे आहे. सदरचे ऑनलाईन (Online) अर्ज **दि.२६/०५/२०१७** पासुन **दि.२७/०६/२०१७** पर्यतच्या मुदतीत सादर करता येईल.(अर्ज नोंदणी **दि.२७/०६/२०१७ रोजी २३.५९ वाजेपर्यंत** सुरु राहील.

II) एका गिरणी कामगारास फक्त एक घर या धोरणाच्या अनुषंगाने मयत गिरणी कामगाराला एकापेक्षा जास्त वारस असल्यास व एकापेक्षा जास्त वारसांनी अर्ज सादर केल्यास मुळ गिरणी कामगारांच्या नावाने सोडत काढुन सर्व वारसांनी केलेल्या अर्जाचा एकत्रितरित्या विचार करण्यात येईल. तसेच यापूर्वी सुध्दा एकापेक्षा जास्त वारसांनी अर्ज सादर केल्याचे आढळुन आल्यास अशा प्रकरणी सुध्दा वरील प्रमाणे पध्दत अंमलात आणण्यात येईल. तसेच मुळ गिरणी कामगार हयात (जिवंत) असल्यास मुळ गिरणी कामगारांनीच ऑनलाईन अर्ज करावा, वारसांनी ऑनलाईन अर्ज करु नये.

III) दि.०१/०१/१९८२ रोजी व तद्नंतर गिरणीच्या सेवेत असलेले व गिरण्या बंद / आजारी झाल्यामुळे नोकरी गमावलेले व नियमित आस्थापनेवर गिरणी कामगार म्हणुन सेवेत असलेल्या गिरणी कामगार / त्यांच्या वारसांना अर्ज करता येईल.

IV) गिरण्यांमध्ये कायम झालेल्या तसेच ज्या गिरणी कामगारांनी त्या गिरणीमध्ये २४० दिवस अखंडीत (Deemed कायम) सेवा केलेली आहे, अशाच गिरणी कामगार / वारस यांना ऑनलाईन अर्ज करता येईल.

V) गिरणी कामगारांची पात्रता ठरविण्यासाठी पुढील ५ पैकी १ निकष (बाब) पुर्ण करणे आवश्यक राहील. (अ) मुळ टिकीट क्रमांक व पी.एफ.(P.F) क्रमांक (ब) मुळ टिकीट क्रमांक व ईएसआयसी (ESIC) क्रमांक (क) वरील अ व ब बाबतचा पुरावा नसल्यास गिरणी व्यवस्थापकाकडुन प्राप्त झालेले प्रमाणपत्र (ड) लाल पास (इ) आय कार्ड / सर्व्हिस सर्टिफिकेट. (सदर पुराव्यापैकी किमान एका पुराव्याची नोंद ऑनलाईन अर्जामध्ये करणे अनिवार्य आहे.)

VI) ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी अर्जदारास रु.१५०/- (प्रशासकीय खर्च) ऑनलाईन (Online) भरणा करणे अनिवार्य असुन रु.१५०/- चा भरणा केल्याशिवाय नोंदणी करता येणार नाही. तसेच ज्या गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांना रु.१५०/- चा भरणा ऑनलाईन पध्दतीने करणे शक्य नाही, त्यांनी म्हाडाने नियुक्त केलेल्या **कोटक महिंद्रा बँकेच्या खालील शाखेमध्ये** बँकेच्या कार्यालयीन वेळेत **दि. २७/०६/२०१७, दुपारी ३.०० वाजेपर्यंत** व्यक्तीश: उपस्थित राहुन रोख रकमेचा भरणा करुन पोच पावती प्राप्त करुन घ्यावी. सदर मुदतीनंतर रोख रक्कम स्विकारण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

- **A) वरळी शाखा -** शॉप नं.३-१०, तळमजला, सिटी व्हयु बिल्डींग, डॉ.ॲनी बेसेंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८, दुरध्वनी क्र.०२२-६७४७४२००
- **B) लालबाग शाखा -** वीर महल स.गृ.नि.संस्था, तळमजला,शॉप नं.९-१२, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, लालबाग, मुंबई-४०००१०,दुरध्वनी क्र.०२२-६५९९१९५८-९०
- **C) कलानगर, वांद्रे(पु) शाखा -** व्हॉलमार्क प्लाझा, तळमजला, गुरुनानक हॉस्पीटल जवळ, कलानगर, वांद्रे (पू), मुंबई-४०००५१, दुरध्वनी क्र.-०२२-६६०५६६१२

VII) **खालील प्रकारात मोडत असलेल्या गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांना सदरचा ऑनलाईन अर्ज करण्याची आवश्यकता नाही :-**

- यापूर्वी सन २०१०-२०११ मध्ये सारस्वत बँक व ॲक्सिस बँकेत गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांनी अर्ज सादर केलेले आहेत, अश्या एकुण १,४८,७११ गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांची गिरणी निहाय यादी म्हाडाचे संकेतस्थळ http://mhada.maharashtra.gov.in येथे प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर यादीमध्ये नाव समाविष्ट असलेल्या गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांना नव्याने ऑनलाईन अर्ज करण्याची आवश्यकता नाही.
- यापूर्वी म्हाडामार्फत गिरणी कामगारांसाठी काढण्यात आलेल्या सोडतीत यशस्वी होऊन ताबा घेतलेल्या तसेच प्रतिक्षायादी कार्यान्वित करण्यात आलेल्या गिरणी कामगार / गिरणी कामगारांचे वारस यांनी पुन्हा नव्याने अर्ज करु नये.
- गिरण्यांच्या जमिनीवरील गिरण्यांच्या चाळीत ज्या गिरणी कामगार / वारस यांना गिरणीमार्फत घराचे वितरण करण्यात आलेले आहेत, अशा गिरणी कामगार / वारस यांनी ऑनलाईन अर्ज सादर करु नये.
- म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीमध्ये केवळ गिरणी संकेत क्रमांकामध्ये फेरबदल करावयाचे असल्यास याबाबत स्वंतत्ररित्या मोहिम राबविण्यात येईल. त्यामुळे अश्या गिरणी कामगार / गिरणी कामगारांच्या वारसांनी या मोहिमेत अर्ज करु नये.

**टिप :- सदरचे ऑनलाईन अर्ज सादर करण्याकरीता म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार अथवा एजंन्ट म्हणुन नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तींशी परस्पर व्यवहार करु नये. तसे केल्यास मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ / म्हाडा कोणत्याही व्यवहारास / फसवणुकीस जबाबदार राहणार नाही.**

**अधिक माहितीसाठी संपर्क**

"म्हाडा लॉटरी केंद्र "
मित्र कार्यालयाशेजारी गेट नं.५ जवळ, गृहनिर्माण भवन
वांद्रे (पु), मुंबई-५१
हेल्प लाईन नं.- ९८६९९८८०००
(०२२-२६५९८९२१ ते २४)
०२२-२६५९२६९२/९३
म्हाडा संकेतस्थळ-https://millworker.mhada.gov.in
https://mhada.maharashtra.gov.in
म्हाडा हेल्पलाईन ई मेल - dycoeastmb@mhada.gov.in

२७/५/१६

**(सुभाष लाखे)**
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
मुंबई